
शुक्रवार दि. २६ जुन २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २९५ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886
https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

जनक्षमता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अॅण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

## हॉटेल्समध्ये ग्राहकांना मोफत शुद्ध पाणी देणे बंधनकारक

# नियम मोडणाऱ्यांची गय नाही - तुकाराम मुंडे



### ‘सुरक्षित अन्न, निरोगी महाराष्ट्र’ मोहिमेत अन्नसुरक्षेच्या गंभीर त्रुटी उघड; हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, धाबे व खानावळींवर एफडीएची करडी नजर

**मुंबई - प्रतिनिधी**

: राज्यातील नागरिकांना सुरक्षित, दर्जेदार व आरोग्यदायी अन्न मिळावे या उद्देशाने अन्न व औषध प्रशासन विभागाने (एफडीए) राज्यभर ‘सुरक्षित अन्न, निरोगी महाराष्ट्र’ ही विशेष मोहीम हाती घेतली असून, या मोहिमेअंतर्गत अन्न व्यावसायिकांवर कडक नजर ठेवण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंडे यांनी सर्व हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, धाबे, खानावळी तसेच अन्नप्रक्रिया करणाऱ्या आस्थापनांना स्पष्ट इशारा दिला आहे की, अन्नसुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांची कोणतीही गय केली जाणार नाही.

मुंडे यांनी सांगितले की, राज्यातील प्रत्येक अन्न व्यावसायिकाने अन्न सुरक्षा आणि मानके कायद्यानुसार नोंदणी व परवाना घेणे बंधनकारक आहे. तसेच अन्न उत्पादन, साठवणूक, प्रक्रिया आणि विक्री यासंदर्भातील सर्व नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे. नियमांचे पालन न करणाऱ्या आस्थापनांवर दंडात्मक कारवाईसह परवाने रद्द करण्याचीही कारवाई केली जाऊ शकते.

**ग्राहकांना मोफत शुद्ध पाणी देणे अनिवार्य**

ग्राहकांच्या आरोग्याच्या दृष्टीने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा असल्याचे सांगत तुकाराम मुंडे यांनी राज्यातील सर्व हॉटेल्स व रेस्टॉरंट्सना ग्राहकांना पिण्यायोग्य व सुरक्षित पाणी मोफत उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत.

यासाठी प्रत्येक आस्थापनाने आपल्या दर्शनी भागात ‘येथे पिण्याचे शुद्ध पाणी मोफत मिळेल’ असा फलक लावणेही बंधनकारक करण्यात आले आहे. ग्राहकांकडून पिण्याच्या पाण्यासाठी अनावश्यक शुल्क आकारणे अथवा असुरक्षित पाणी देणे आढळल्यास संबंधित आस्थापनांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला.

**अन्नसुरक्षेच्या नियमांची कठोर अंमलबजावणी**

पत्रकार परिषदेत बोलताना तुकाराम मुंडे म्हणाले की, ‘‘अन्नात कुठेही भेसळ होऊ नये यासाठी राज्यातील अन्न व्यावसायिकांनी निर्धारित नियमांचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. २३ जून रोजी यासंदर्भात आदेश जारी करण्यात आले आहेत. राज्यातील सर्व हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि इटरीज यांनी अन्न सुरक्षा मानकांनुसार नोंदणी करणे बंधनकारक असेल.’’

ते पुढे म्हणाले की, अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ तसेच अन्न सुरक्षा व मानके नियम, २०११ यांच्या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. विशेषतः शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शाळा परिसरातील खाद्यपदार्थ विक्रेत्यांवरही विशेष लक्ष केंद्रित करण्यात येत आहे.

**मोहिमेत उघड झाल्या धक्कादायक बाबी**

राज्यात सुरू असलेल्या ‘सुरक्षित अन्न, निरोगी महाराष्ट्र’ मोहिमेदरम्यान एफडीएच्या अधिकाऱ्यांनी अनेक हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि खाद्य व्यावसायिकांची तपासणी केली. या तपासणीत अनेक गंभीर त्रुटी आढळून आल्या आहेत.

तपासणीदरम्यान काही ठिकाणी अत्यंत अस्वच्छ वातावरणात अन्न तयार केले जात असल्याचे निदर्शनास आले. तसेच स्वयंपाकासाठी वापरलेले तेल पुन्हा पुन्हा वापरणे, निकृष्ट दर्जाचे पॅकेजिंग साहित्य वापरणे, अन्नसाहित्याची अयोग्य साठवणूक करणे आणि स्वच्छतेच्या नियमांकडे दुर्लक्ष करणे अशा बाबी समोर आल्या. आरोग्यास गंभीर धोका निर्माण करणाऱ्या या प्रकारांमुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो, असेही प्रशासनाने नमूद केले आहे.

**ग्राहकांनीही सतर्क राहण्याचे आवाहन**

अन्न व औषध प्रशासन विभागाने नागरिकांनाही सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. हॉटेल किंवा रेस्टॉरंटमध्ये अस्वच्छता, दूषित अन्न, असुरक्षित पाणी किंवा नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधित विभागाकडे तक्रार करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

ग्राहकांच्या आरोग्याशी तडजोड करणाऱ्या कोणत्याही आस्थापनाला यापुढे माफी दिली जाणार नाही, असा स्पष्ट संदेश प्रशासनाने दिला आहे.

**राज्यभर विशेष तपासणी मोहीम सुरू**

एफडीएच्या पथकांकडून आगामी काळात राज्यभर विशेष तपासणी मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार असून, हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, खानावळी, धाबे, बेकरी, मिठाई दुकाने आणि अन्नप्रक्रिया उद्योगांची अचानक तपासणी केली जाणार आहे. नियमांचे उल्लंघन आढळल्यास दंड, परवाना निलंबन किंवा गुन्हे दाखल करण्यासारखी कठोर कारवाई केली जाणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

राज्यातील नागरिकांना सुरक्षित अन्न आणि शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने सुरू केलेली ही मोहीम येत्या काळात अधिक व्यापक स्वरूपात राबवली जाणार असून, अन्न व्यावसायिकांनी नियमांचे पालन करणे आता अपरिहार्य ठरणार आहे.

## जालना शहर व ग्रामीण भागातील वीज समस्येवर आ. खोतकर ॲक्शन मोडमध्ये

### महावितरण अधिकाऱ्यांची तातडीची बैठक

**जालना -प्रतिनिधी**



जालना शहरासह ग्रामीण भागात गेल्या काही दिवसांपासून वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, कमी दाबाने मिळणारी वीज तसेच महावितरणच्या गलथान कारभारामुळे नागरिक, व्यापारी, शेतकरी व सर्वसामान्य जनतेमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. या गंभीर प्रश्नाची दखल घेत जालना विधानसभा मतदारसंघाचे आमदार अर्जुनराव खोतकर* यांनी वीज प्रश्नावर आक्रमक भूमिका घेतली असून, महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची तातडीची बैठक बोलावली आहे.

दिनांक २६ जुन २०२६ रोजी सकाळी ९.४५ वाजता भाग्यनगर येथील दर्शना बंगला येथे ही महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे. जालना शहर व ग्रामीण भागातील वीज समस्यांबाबत विधानसभेत प्रभावीपणे आवाज उठवल्यानंतर प्रथमच आमदार खोतकर यांनी थेट महावितरणच्या अधिकाऱ्यांसमवेत आढावा बैठक आयोजित केली आहे. त्यामुळे या बैठकीकडे जालना जिल्ह्यातील नागरिकांचे विशेष लक्ष लागले आहे. या बैठकीमध्ये जालना शहर व ग्रामीण भागातील वारंवार होणारी वीज *(पान २ वर)*

## गोदावरी नदीपात्रातील अवैध वाळू उत्खननावर घनसावंगी पोलिसांचा पहाटे छापा; पाच हायवा टिपरसह दीड कोटींचा मुद्देमाल जप्त

**घनसावंगी । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील अवैध वाळू उत्खननाविरोधात घनसावंगी पोलिसांनी मोठी कारवाई करत गोदावरी नदीपात्रातून अवैधरित्या वाळू उपसा व वाहतूक करणाऱ्या टोळीवर पहाटेच्या सुमारास धडक छापा टाकला. या कारवाईत पाच हायवा टिपर, सुमारे २५ ब्रास वाळू तसेच



एकूण १ कोटी ५१ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


**गोपनीय माहितीच्या आधारे छापा**

घनसावंगी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक केतन राठोड यांना २५ जून २०२६ रोजी पहाटे दोन वाजण्याच्या सुमारास गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली. शिरसवाडी शिवारातील गोदावरी नदीपात्रामध्ये काही व्यक्ती स्वतःच्या *(पान २ वर)*




अंबड चौफुली येथे वाहतूक शाखेने मोठा बोर्ड लावला असून रोहनवाडीच्या पुलाचे काम चालू असून व पुंडलिका नदीला पूर आल्यामुळे रस्ता बंद केला आहे अंबड बीड कडे जाणाऱ्या वाहनांनी अंबड रोड चा वापर करावा व रिंग रोडचा वापर करावा

**छायाचित्र किरण खानापुरे**



# संपादकीय....

## निधी, निष्ठा आणि बदलते राजकारण

जालन्यात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने आयोजित केलेले ‘भीक मांगो’ आंदोलन हे केवळ एका पक्षाचे आंदोलन नसून, सध्याच्या राजकारणातील बदलत्या मूल्यव्यवस्थेवर केलेले एक प्रतीकात्मक भाष्य मानावे लागेल. निधी मिळत नसल्याचे कारण देत काही खासदारांनी पक्षत्याग केल्याच्या पार्श्वभूमीवर हे आंदोलन झाले असले, तरी त्यामागे अनेक गंभीर राजकीय आणि सामाजिक प्रश्न दडलेले आहेत.

लोकशाहीमध्ये पक्षांतर हा कायदेशीर अधिकार असला, तरी जनतेने दिलेला कौल, पक्षाची विचारधारा आणि कार्यकर्त्यांची निष्ठा या बाबींनाही तितकेच महत्त्व असते. मतदार अनेकदा उमेदवारापेक्षा पक्षाच्या विचारसरणीवर आणि नेतृत्वावर विश्वास ठेवून मतदान करतात. अशा परिस्थितीत निवडून आल्यानंतर पक्ष सोडण्याच्या घटनांमुळे मतदारांमध्ये नाराजी निर्माण होणे स्वाभाविक आहे.

जालन्यातील आंदोलनात ‘निधी महत्त्वाचा की विचार?’ हा प्रश्न उपस्थित करण्यात आला. विकासकामांसाठी निधी आवश्यकच आहे. मात्र, केवळ निधी न मिळाल्याचे कारण देऊन पक्षत्याग करण्यामागील वास्तविक कारणे काय आहेत, हा प्रश्न जनतेच्या मनात निर्माण होतो. लोकप्रतिनिधींनी विकासासाठी संघर्ष करावा की राजकीय भूमिका बदलावी, याचे उत्तर मतदारच देऊ शकतात.

या आंदोलनातील दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे शेतकरी कर्जमाफी. महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये शेती संकटात असून कर्जबाजारीपणाचा प्रश्न कायम आहे. त्यामुळे सरसकट कर्जमाफीची मागणी पुन्हा एकदा पुढे आली आहे. मात्र, कर्जमाफी हा तात्पुरता दिलासा असला, तरी शेती उत्पादनाला हमीभाव, सिंचन व्यवस्था, पीकविमा आणि बाजारपेठेतील स्थिरता यांसारख्या दीर्घकालीन उपायांवरही सरकारने भर देणे आवश्यक आहे.

‘भीक मांगो’ आंदोलनाची शैलीही चर्चेचा विषय ठरली. लोकशाहीत प्रतीकात्मक आंदोलने नवी नाहीत. मात्र, राजकीय विरोध व्यक्त करताना भाषेची मर्यादा, वैचारिक संघर्ष आणि लोकशाही मूल्ये जपणे तितकेच महत्त्वाचे आहे. तीव्र राजकीय मतभेद असले तरी वैयक्तिक द्वेष किंवा हिंसक भाषेपासून दूर राहणे हे सर्व पक्षांसाठी आवश्यक आहे. आज देशाच्या राजकारणात विचारांपेक्षा सत्ता, निष्ठेपेक्षा संधी आणि जनहितापेक्षा राजकीय गणितांना अधिक महत्त्व दिले जात असल्याची टीका सातत्याने होत आहे. त्यामुळे जालन्यातील हे आंदोलन केवळ काही खासदारांविरोधातील निषेध म्हणून न पाहता, राजकारणातील बदलत्या प्रवृत्तीविरोधातील अस्वस्थतेचे प्रतीक म्हणूनही पाहावे लागेल. अखेरीस, जनतेला केवळ पक्षांतराच्या राजकारणापेक्षा विकास, रोजगार, शेती, शिक्षण आणि आरोग्य यांसारख्या मूलभूत प्रश्नांची उत्तरे हवी आहेत. लोकप्रतिनिधींनीही निधी, पक्ष आणि सत्तेच्या पलीकडे जाऊन जनतेचा विश्वास टिकविण्यासाठी काम करणे, हीच लोकशाहीची खरी अपेक्षा आहे.

दैनिक युवा आदर्श दि. २६-०६-२०२६

CHANGE IN NAME

I HAVE CHANGE MY NAME FROM
My Old Name
SIDDIQUI SHIRIN BEGUM
To New Name
SHIREEN VIKHARPASHA SIDDIQUI
For Passport Issuence
Add-S N. 544 D P Road Dukhi
Nagar Jalna. 431203

दैनिक युवा आदर्श दि. २६-०६-२०२६

CHANGE IN NAME

I HAVE CHANGE MY NAME FROM
My Old Name
SHIRIN BEGUM VIKHAR PASHA
SIDDIQUI
To New Name
SHIREEN VIKHARPASHA SIDDIQUI
For Passport Issuence
Add-S N. 544 D P Road Dukhi
Nagar Jalna. 431203

दैनिक युवा आदर्श दि. २६-०६-२०२६

CHANGE IN NAME

I HAVE CHANGE MY NAME FROM
My Old Name
VIKHAR PASHA SIDDIQUI
To New Name
VIKHARPASHA ARIFUDDIN SIDDIQUI
For Passport Issuence
Add- D P Road Dukhi Nagar Jalna.
431203

# फुफ्फुसांच्या पलीकडे: एक सिगारेट आपल्या आध्यात्मिक ऊर्जेची कशी हानी करते !

व्यसनाधीनतेच्या विनाशकारी दुष्परिणामांबद्दल जगाला सतर्क करण्यासाठी दरवर्षी २६ जून आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ विरोधी दिन म्हणून पाळला जातो. धूम्रपानाच्या शारीरिक दुष्परिणामांबद्दल जगभर जागृती असली, तरी महर्षि अध्यात्म विश्वविद्यालयाच्या एका चित्तवेधक अभ्यासाने आपल्या आरोग्याच्या एका पूर्णतः भिन्न पैलूवर प्रकाश टाकला आहे - आपली सूक्ष्म ऊर्जा !

**प्रयोग: विनाशाचे ८ झुरके**

धूम्रपान एखाद्या व्यक्तीच्या कुंडलिनी-चक्रांवर नेमका काय परिणाम करते, याचा अभ्यास करण्यासाठी महर्षि अध्यात्म विश्वविद्यालयाच्या वतीने नुकताच एक प्रयोग करण्यात आला. कुंडलिनी-चक्रे आपल्या शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक कार्यांना सूक्ष्म ऊर्जा पुरवतात. ‘बायो-वेल’ (-) (टीप १) हे वैज्ञानिक उपकरण, तसेच पारंपरिक लोलक () यांचा वापर करून, सिगारेटचे केवळ ८ झुरके घेतल्यानंतर एका व्यक्तीच्या कुंडलिनी-चक्रांत झालेल्या ऊर्जा बदलांचा संशोधकांनी अभ्यास केला.

टीप १: बायो-वेल हे उपकरण रशियन संशोधकांनी विकसित केले असून ते इलेक्ट्रो-फोटोनिक इमेजिंग () तंत्रज्ञानाचा वापर करून एखाद्या व्यक्तीचे ऊर्जा क्षेत्र आणि त्याच्या कुंडलिनीच्या चक्रांची स्थिती () यांची मोजणी करते.

या प्रयोगासाठी, संशोधकांनी अनेक वर्षे पूर्णवेळ साधना करणाऱ्या एका साधकाची आधी मूलभूत चाचणी ( ) घेतली. धूम्रपान करण्यापूर्वी त्याच्या कुंडलिनी-चक्रांतील ऊर्जेची स्थिती निरामय होती.

चक्रांची उत्तम स्थिती : साधकाची सहस्रार, आज्ञा आणि मूलाधार ही चक्रे मध्येरेषेच्या (सुषुम्ना नाडी) लगत, म्हणजे ईश्वरी चैतन्य ग्रहण करण्यास पूरक स्थितीत होती.

मोठ्या प्रमाणात सकारात्मक ऊर्जा : साधकामधे नकारात्मक ऊर्जा शून्य आढळली, तर त्याच्या सकारात्मक ऊर्जेची प्रभावळ ५.३ मीटरपर्यंत होती.

त्यानंतर त्या सहभागी साधकाने (आपली सेवा म्हणून केवळ संशोधनासाठी) सिगारेटचे केवळ आठ झुरके घेतले. यामुळे तात्काळ एक मोठा बदल घडून आला:

लगेचच (० मिनिटांनंतर): सकारात्मक ऊर्जेची प्रभावळ केवळ ०.८ मीटर राहिली, तर नकारात्मक ऊर्जेची प्रभावळ ७ मीटर एवढी निर्माण झाली.

२० मिनिटांनंतर: सकारात्मक ऊर्जा पूर्णपणे शून्य झाली आणि नकारात्मक ऊर्जा १५ मीटरपेक्षा जास्त झाली. सहस्रार आणि मणिपूर चक्रांनी नकारात्मक ऊर्जा ग्रहण केली, ज्यामुळे साधकाची ईश्वरी चैतन्य ग्रहण करण्याची क्षमता, तसेच पचनक्षमता यावर अत्यंत वाईट परिणाम झाला.

३० मिनिटांनंतर: शरीराने नकारात्मक ऊर्जेला विरोध करण्यास सुरुवात केली, ज्यामुळे ती काही प्रमाणात कमी झाली (१२.५ मीटर) आणि सकारात्मक ऊर्जा (१ मीटर) निर्माण व्हायला सुरुवात झाली. निष्कर्ष

लोलकाच्या सहाय्यानो केलेल्या अभ्यासातील निष्कर्ष पूर्णतः ‘बायो-वेल’ या उपकरणाने केलेल्या निष्कर्षाशी मिळते-जुळते होते, ज्यात हे स्पष्ट झाले की सिगारेटच्या केवळ ८ झुरक्यांचा नकारात्मक प्रभाव साधकाची चक्रे आणि प्रभामंडळ () यांवर सुमारे अर्धा तास राहिला. साधक अनेक वर्षांपासून नियमित साधना करत असल्यामुळे हे शक्य झाले. जे लोक नियमित साधना करत नाहीत, त्यांच्यात या नकारात्मकतेशी लढण्याची क्षमता खूप कमी असते. फलस्वरूप त्यांच्यावर धूम्रपानाचे परिणाम दीर्घकाळ राहू शकतात. वारंवार धूम्रपान केल्याने व्यक्तीचे प्रभामंडळ आणि चक्रे यांवर कायमस्वरूपी नकारात्मक परिणाम होऊ शकतात; ज्यामुळे आरोग्याच्या मोठ्या समस्या उद्भवू शकतात. तथापि, निरंतर साधनेच्या माध्यमातून व्यक्ती आपली कुंडलिनी-चक्रे सुदृढ करू शकते आणि व्यसनांवर () सहज मात करू शकते. हा प्रयोग तर केवळ एक अंशमात्र ( ) आहे. कडे असे अनेक केस स्टडीज आहेत जिथे लोकांनी साधनेच्या माध्यमातून किमान प्रत्याहार लक्षणांसह ( ) अल्प कालावधीत व्यसनांवर मात केली आहे.

**- डॉ. (सौ.) नंदिनी सामंत,**
**महर्षि अध्यात्म विश्वविद्यालय, गोवा.**

# लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज !

आज २६ जून, लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती. आजच्याच दिवशी १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात त्यांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव तर आईचे नाव राधाबाई असे होते. कोल्हापूर ( करवीर ) संस्थानचे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर महाराणी आनंदीबाई यांनी कोल्हापूरच्या गादीचे वारसदार म्हणून त्यांना १७ मार्च १८८४ रोजी दत्तक घेतले कारण चौथे शिवाजी महाराज यांना मुलबाळ नव्हते. दत्तक घेतल्यावर त्यांचे छत्रपती शाहू महाराज असे नामकरण करण्यात आले. शिक्षण पूर्ण झाल्यावर २ एप्रिल १८९४ रोजी ते कोल्हापूरच्या गादीवर विराजमान झाले. राज्यभिषेक झाल्यावर १९२२ पर्यंत म्हणजे २८ वर्ष ते कोल्हापूर संस्थानचे राजे होते. छत्रपती शाहू महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा पुढे चालवला. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवूनच त्यांनी राज्यकारभार केला म्हणूनच ते राजर्षी बनले. ते खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते. बहुजन समाजाला मानसिक गुलामीतूम बाहेर काढून, तत्कालीन रूढी परंपरा नाकारुन त्यांनी कोल्हापूर संस्थानामध्ये अनेक सामाजिक सुधारणा केल्या. शाहू महाराजांनी बहुजन समाजामध्ये शिक्षण प्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. शिक्षणाचे महत्व ओळखणारे देशातील पहिले राजे हे छत्रपती शाहू महाराज हेच होते. राज्यातील निरक्षर, गरीब, अस्पृश्य, दलित या बहुजन समाजातील लोकांना शिक्षण दिले तरच त्यांचा सर्वांगीण विकास होईल हे ओळखून त्यांनी समाजातील वंचित, दुर्लक्षित वर्गातील मुलांसाठी वसतिगृहे काढली. विविध जातीधर्मातील मुलांसाठी त्यांनी २२ वसतिगृहे स्थापली त्यात शेकडो मुले शिकली. शिक्षण क्षेत्रात मुलींची संख्या वाढली पाहिजे या हेतूने त्यांनी मुलींना ४० रुपये स्कॉलरशिप सुरू केली. ब्रिटिश सरकार शिक्षणावर वार्षिक ८० हजार रुपये खर्च करत असताना कोल्हापूर संस्थानचा शिक्षणावरील वार्षिक खर्च हा एक लाख रुपये इतका होता. यातच शाहू महाराज यांची शिक्षणाविषयी किती तळमळ होती हे दिसून येते. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी सुवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची दृष्ट पद्धत रद्द केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला करावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, तंत्र व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा त्यांनी सुरू केल्या. मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणायचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे हा व्यापक विचार डोळ्यासमोर ठेवून ६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के जागा राखीव ठेवल्या म्हणूनच त्यांना आरक्षणाचे जनक असे म्हणतात. शाहू महाराजांच्या या निर्णयाला तेंव्हा खूप विरोध झाला पण विरोधाला न जुमानता त्यांनी या आरक्षणाची कठोर अंमलबजावणी केली. शाळा, दवाखाने, पाणवठे अशा सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांशी समतेने वागावे, त्यांच्याशी कोणीही भेदभाव करू नये असा आदेश त्यांनी काढला. १९१७ साली विधवा विवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. त्यांनी देवादासींची घातक प्रथा बंद केली. बहुजन समाजाला राजकीय प्रवाहात सामावून घेण्यासाठी १९१६ साली निपाणी येथे डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. जातिभेदाची प्रथा नष्ट व्हावी म्हणून त्यांनी आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली. इतकेच नाही तर आपल्या चुलत बहिणीचे लग्न धनगर समाजातील यशवंतराव होळकर यांच्याशी लावून दिले. छत्रपती शाहू महाराजांनी स्पिनिंग अँड व्हीविंग मिल, शाहूपुरी व्यापारपेठ, शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था, राधानगरी धरणाची उभारणी, शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करुन देणे असे अनेक उपक्रम आपल्या संस्थानात राबवले.

# पान १ व ४ वरुन...

### जालना शहर...

खंडितता, तांत्रिक बिघाड, अपुरी देखभाल, वाढत्या वीज मागणीच्या तुलनेत उपलब्ध यंत्रणा, पावसाळ्यात उद्भवणाऱ्या अडचणी तसेच नागरिकांच्या तक्रारींचा सखोल आढावा घेतला जाणार आहे. यासोबतच वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी तातडीच्या उपाययोजना, आवश्यक मनुष्यबळ व यंत्रसामग्रीची उपलब्धता याबाबतही चर्चा होणार आहे.

बैठकीस महावितरणचे अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उपअभियंता (शहर), शहर अभियंता, उपअभियंता (ग्रामीण) तसेच सर्व शाखा अभियंते उपस्थित राहणार आहेत.

जालना शहर व ग्रामीण भागातील नागरिकांना अखंडित व दर्जेदार वीजपुरवठा मिळावा, यासाठी कोणतीही हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नसल्याचे आमदार अर्जुनराव खोतकर यांनी स्पष्ट केले असून, नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रशासनाला जबाबदार धरण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.या बैठकीतून वीज समस्येवर ठोस निर्णय व प्रभावी उपाययोजना जाहीर होतील, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

### गोदावरी नदीपात्रातील...

आर्थिक फायद्यासाठी हायवा टिपरच्या साहाय्याने अवैध गौण खनिजाचे उत्खनन आणि वाहतूक करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. मिळालेल्या माहितीची खात्री करून तातडीने कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले. त्यानुसार पोलीस निरीक्षक केतन राठोड यांनी विशेष पथकाची स्थापना करून ते शिरसवाडी परिसरातील गोदावरी नदीपात्राकडे रवाना केले.

नदीपात्रात सुरू होता अवैध वाळू उपसा पोलीस पथक घटनास्थळी पोहोचले असता काही व्यक्ती गोदावरी नदीपात्रातून वाळू काढून ती पाच हायवा टिपरमध्ये भरत असल्याचे दिसून आले. रात्रीच्या अंधारात सुरू असलेला हा अवैध वाळू उपसा पाहून पोलिसांनी तत्काळ छापा टाकला.

अचानक झालेल्या या कारवाईमुळे संबंधितांमध्ये एकच खळबळ उडाली. पोलिसांनी पाचही हायवा टिपर ताब्यात घेत त्यांच्या चालकांची चौकशी केली.

**परवाना व कागदपत्रे नसल्याचे उघड**

तपासादरम्यान चालकांकडे वाळू उत्खनन व वाहतुकीसंदर्भातील कोणतेही वैध परवाने, रॉयल्टी पावत्या अथवा आवश्यक कागदपत्रे आढळून आली नाहीत. त्यामुळे पोलिसांनी संबंधित वाहनांसह वाळूचा साठा जप्त केला.

कारवाईदरम्यान पाच हायवा टिपर आणि त्यामधील अंदाजे २५ ब्रास वाळू असा एकूण १ कोटी ५१ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**घनसावंगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल**

जप्त करण्यात आलेले सर्व हायवा टिपर आणि वाळू पुढील कायदेशीर कारवाईसाठी घनसावंगी पोलीस ठाण्यात आणण्यात आली. या प्रकरणी २५ जून २०२६ रोजी संबंधितांविरुद्ध अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस आणि महसूल विभागाच्या समन्वयाने पुढील तपास सुरू असून या अवैध उत्खननामागील मुख्य सूत्रधार, वाहनमालक आणि आर्थिक हितसंबंध असलेल्या व्यक्तींचा शोध घेण्यात येत आहे.

**पर्यावरणाला धोका, शासनाला महसुली तोटा**

गोदावरी नदीपात्रातून होणाऱ्या अवैध वाळू उपशामुळे नदीचे नैसर्गिक स्वरूप बदलत असून पर्यावरणीय समतोल बिघडण्याची शक्यता वाढत आहे. नदीपात्र खोल होणे, पाण्याची पातळी घटणे, किनाऱ्यांची धूप होणे तसेच भूजल पातळीवर परिणाम होणे अशा समस्या निर्माण होत आहेत.

याशिवाय शासनाच्या महसुलालाही मोठा फटका बसत असल्याने अशा अवैध व्यवसायांवर अंकुश ठेवण्यासाठी प्रशासनाकडून विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

**वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई**

ही कारवाई जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी तसेच अंबड उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सिद्धेश्वर धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कारवाईत घनसावंगी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक केतन राठोड यांच्यासह सहाय्यक पोलीस निरीक्षक खरात, पोलीस शिपाई प्रकाश पवार, राधेश्याम गुसिंगे, डिगंबर पोटे, कपील अडियाल, सुरेश राठोड, नवनाथ राऊत आणि लोखंडे यांनी सहभाग घेतला.

**अवैध वाळू तस्करांविरोधात मोहीम अधिक तीव्र**

जालना जिल्ह्यात अवैध वाळू उत्खनन आणि वाहतुकीविरोधात पोलीस प्रशासनाने कठोर भूमिका घेतली असून अशा प्रकारच्या कारवाया पुढील काळात आणखी तीव्र करण्यात येणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

अवैध वाळू माफियांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याने तसेच पर्यावरण आणि शासनाच्या महसुलाचे नुकसान होत असल्याने अशा प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या व्यक्तींविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

### टेंभुर्णी येथे...

घेणाऱ्या आणि विकणाऱ्या दोघांची खूप परेशानी झालेली दिसली. शेतात सगळी कडे पाणीच पाणी झालेले दिसून आले. शेतकरी राजा या वेळी मोठ्या आनंदात दिसले.

### २८ जुन रोजी...

येईल. दो बुंद जिंदगी के. दोन थेंब प्रत्येक वेळी, पोलिओवर विजय दरवेळी.

आवाहन : ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांना पोलिओ लसची मात्रा सर्व पालकांनी द्यावी.

### उपविभागीय...

आरोग्य सेवा सुलभरितीने जनतेला उपलब्ध करुन देणे, नागरिक/रुग्णांच्या आरोग्य विषयक समस्यांचे गुणात्मक निराकरण करणे, संस्था/विभागातंगर्गत समन्वय स्थापित करणे, आरोग्य विषयक उपक्रम/कार्यक्रमांची यशस्वी अंमलबजावणी करणे, आरोग्य उपक्रमांमध्ये समुदाय सहभाग अधिक व्यापक करणे व आरोग्य संस्थांचा गुणांकन दर्जा सुधारणे या व्यापक दृष्टीने राज्यात ग्रामीण क्षेत्रातील विधानसभा मतदार संघ / महानगरपालिका क्षेत्रातील विधानसभा मतदार संघ, जिल्हा व राज्य स्तरावर ‘‘एकात्मिक आरोग्यवर्धिनी समिती ‘‘स्थापित करणे बाबत निर्देश दिले आहेत. आशा कार्यबल गट सभा :- आशा कार्यबल गटाची सभा आयोजीत करण्यात आली, तालुकांतर्गत आशा सवयंसेवीका योजनेची अंमलबजावणी सुरु असुन, राष्ट्रीय आरोग्य अभीयानांतर्गत ग्रामीण व विशेषत आदिवासी क्षेत्रातील प्रत्येक गावात वाडया व वस्ती स्तरावर स्थानिक आरोग्य कार्यकती असावी या दृष्टीकोनातुन आशा कार्यकती यांची निवड करण्यात आली. आशा स्वयंसेवीका यांना दरमहा कामावर आधारीत मोबदला अदा करण्यात येतो. त्याअनुषगांने कार्यक्षेत्रात येणा-या अडी-अडचणीचे निराकरण करण्यासाठी तसेच ज्या कार्यक्षेत्राचे कामकाज कमी होत आहे, गरोदर माता व लसीकरण, पिएमजेवाय, आभा कार्ड, टिबी, लेप्रसी लेप्रसी, युव्हीन आरसीएच, इत्यादी पोर्टल व लाभार्थी नोंदणी, आरोग्य सेवा बाबत आशा स्वयंसेवीका यांना कार्यक्षेत्रात येणा-या अडचणी व तक्रारी या बाबत तालुकास्तरीय तक्रार निवारण प्रणाली स्थापन करण्याबाबत केंद्र शासनाकडुन प्राप्त झालेल्या सुचना नुसार आयोजीत करण्यात आली. माझं गांव आरोग्य संपन्न गांव अभियान यात १ एप्रिल २०२६ रोजी विशेष ग्रामसभा आयोजीत करणे बाबत शासन स्तरावरुन निर्णय निर्गमीत करण्यात आला, आयुक्त आरोग्य विभाग मुंबई याचे पत्र व शासन निर्णय या वरुन तालुका स्तरावर अभियान बाबत कार्यशाळा घेण्यात आली सदर कार्यशाळेत वरिल मान्यवर व अधिकारी यांनी खालील प्रमाणे मार्गदर्शन घेऊन अभियान यशस्वी रित्या पुर्ण करणे बाबत कळविले.

अभियानाच्या यशस्वी अमलबजावणी करीता तालुकास्तरीय समन्वय व नियोजन करणे तालुका व ग्रामस्तरीय यंत्रणा यांना मार्गदर्शन देणे, प्रगतीचा नियमीत आढावा घेऊन कार्यक्षेत्रातील सर्व ग्रामपंचायतीनी सदर अभियानात सक्रीय सहभाग नोंदवुन ग्रामस्तरावर आरोग्य विषयक जनजागृती. तपासणी शिबीर, स्वच्छता उपक्रम, जिवनशैली सुधारणा, नागरिकाचे आरोग्यमान उंचावणे, संसर्गजन्य / असंसर्गीक आजाराचे प्रमाण कमी करणे, माता व बाल आरोग्य निर्देक्षांक सुधारण्याच्या उदेशाने सार्वजनिक आरोग्य विभागा मार्फत माझं गांव आरोग्य संपन्न गांव ‘‘ अभियान राबविण्या बाबत निर्णय घेण्यात आला असुन आदी उपक्रम प्रभावीपणे राबवणे बाबत पदाधिकारी यांनी तालुकास्तरीय व अंतर्गत अधिकारी व कर्मचारी यांची कार्यशाळा पंचायात समिती, जालना येथे दि. २७ एप्रिल २०२६ रोजी घेण्यात आली. सहाय्यक महसुल अधिकारी याच्या उपस्थीतीत तालुका आरोग्य अधिकारी जालना यांनी वरील विषयी मार्गदर्शन व कर्मचारी यांना सुचना देण्यात आल्या.

### ऊसतोड कामागारांच्या...

मुलींचे वसतिगृह, बदनापूर मान्य संख्या १००, संत भगवानबाबा मुलांचे वसतिगृह, बदनापूर मान्य संख्या १००, संत भगवानबाबा मुलांचे वसतिगृह, घनसावंगी मान्य संख्या १००, या शासकीय वसतिगृहांमध्ये सन २०२६-२७ या चालु शैक्षणिक वर्षात प्रवेश घेण्यासठी इच्छुक पात्र विद्यार्थ्यांना यादीमध्ये नमुद वसतिगृहाच्या ठिकाणी संपर्क साधण्याचे आवाहन सहायक आयुक्त डॉ. अनिता राठोड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

### मत्स्योदरी अभियांत्रिकीच्या...

संधी उपलब्ध होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

ते पुढे म्हणाले की, आजचे युग हे आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग, ऑटोमेशन आणि चॅटजीपीटीसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचे आहे. कोणत्याही शाखेतील विद्यार्थी योग्य प्रशिक्षण घेतल्यास सॉफ्टवेअर व इतर उद्योग क्षेत्रात यशस्वी करिअर घडवू शकतो. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमात सर्व विभागप्रमुखांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. प्लेसमेंट ऑफिसर प्रा. कृष्णा ताठे यांनी अद्याप नोकरीची संधी न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी उद्योग-संस्था परस्परसंवाद उपक्रमांतर्गत प्रशिक्षण सुरू असल्याची माहिती देत, त्यांनाही लवकरच रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील असे सांगितले.

यावेळी उपप्राचार्य तथा यांत्रिकी अभियांत्रिकी विभागप्रमुख प्रा. आर. एल. करवंदे, प्रा. के. सी. ओ. रेड्डी, प्रा. दत्तात्रय सोळंके, प्रा. संदीप गीते, प्रा. कृष्णा खर्जुले, प्रा. मो. इरफान, सर्व विभागांचे प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन प्रा. पंकज भोयर यांनी केले. यावेळी विद्यार्थी परिषदेच्या सदस्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# इंडो जर्मन टुल रुम आणि अमृतचा विशेष उपक्रम; खुल्या वर्गातील तरुणांना व्यवसायासाठी मोफत प्रशिक्षण

जालना, दि.२५(जिमाका): इंडो जर्मन टूल रूम आणि अमृत चा विशेष उपक्रम; खुल्या वर्गातील तरुणांना मिळणार मोफत प्रशिक्षण व्यवसायासाठी विशेष सहाय्य

खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील युवक-युवतींसाठी रोजगार व स्वयंरोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी अमृत म्हणजेच महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी, पुणे ही महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था आणि इंडो-जर्मन टूल रूम (भारत सरकारची संस्था) यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. पात्र उमेदवारांना अत्याधुनिक तांत्रिक कौशल्ये दिली जाणार असून, प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर नामांकित कंपन्यांद्वारे नोकरी, तसेच व्यवसाय सुरू करण्यासाठी मार्गदर्शन व सहकार्यही मिळणार आहे.

इंडो जर्मन टूल रूम, संभाजीनगर ही भारत सरकारची संस्था असून त्याच्या महाराष्ट्रामध्ये इतरत्र चार शाखा आहेत. मुख्य शाखा संभाजीनगर येथे असून त्या ठिकाणी प्रशिक्षण सोबत राहण्याची सोय देखील उपलब्ध आहे. संभाजीनगर येथील शाखेमध्ये अतिशय दर्जेदार व उत्कृष्ट दर्जाचे मशिनरी आणि इतर उपकरणे उपलब्ध असून अत्यंत अचूकतेने काम करण्यासाठी अत्याधुनिक आणि उत्कृष्ट दर्जाचे प्रशिक्षण दिल्या जाते. या उत्कृष्ट दर्जाच्या प्रशिक्षणाचा लाभ अमृतच्या लक्षित गटातील उमेदवारांना मिळण्यासाठी ‘‘अमृत‘‘ ने इंडो जर्मन टूल रूम यांच्यासोबत सामंजस्य करार केलेला आहे. व सुमारे ४५ विविध कोर्सेस साठी संधी उपलब्ध करून दिलेली आहे.

अमृतच्या या उपक्रमांतर्गत पात्र युवक-युवतींना निःशुल्क प्रशिक्षण दिले जाणार आहे. सदर प्रशिक्षणाचा संपूर्ण खर्च (प्रशिक्षण, राहणे व जेवण) अमृत, पुणे मार्फत केला जाईल. निवासी प्रशिक्षणाची सोय फक्त आय.जी.टी. आर. छत्रपती संभाजीनगर येथेच उपलब्ध असून संस्थेच्या पुणे, नागपूर, कोल्हापूर आणि वाळूज उपकेंद्रात अनिवासी प्रशिक्षणाची सोय उपलब्ध आहे. उद्योग क्षेत्राच्या गरजा लक्षात घेऊन अभ्यासक्रमांची आखणी करण्यात आली असून, रोजगारक्षम कौशल्यांवर यात भर दिला जाणार आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश राज्यातील विशेषतः ग्रामीण भागातील युवक-युवतींना आधुनिक काळातील कौशल्ये ( ) शिकवून त्यांना आत्मनिर्भर बनवणे हा आहे. कौशल्यांअभावी कोणीही रोजगारापासून वंचित राहू नये आणि युवकांची रोजगारक्षमता () वाढावी, यासाठीच ह्या प्रशिक्षण कार्यक्रमाची निर्मिती करण्यात आली आहे. पात्रता व अटी- या प्रशिक्षणासाठी पात्रता अट म्हणजे उमेदवार खुल्या वर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गातील अमृतच्या लक्षित गटातील असावा. त्याची आवश्यक शैक्षणिक पात्रता संबंधित अभ्यासक्रमासाठी निश्चित केल्याप्रमाणे असेल. वयोमर्यादा व इतर अटी संस्थेच्या नियमानुसार लागू राहतील. आवश्यक सर्व कागदपत्रांसह अर्ज करणे बंधनकारक राहील. अर्ज कुठे करायचा? खुल्या वर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील वयोगट १८ ते ४० मधील इच्छुक पात्रताधारक उमेदवारांनी अमृत संस्थेच्□ ... या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन अर्ज करावा व अर्जात नमूद केल्याप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता करावी, यासंदर्भात इतर आवश्यक माहितीसाठी अमृत संस्थेच्या प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हा अमृत कार्यालयाशी संपर्क साधावा.

निवड प्रक्रिया-प्राप्त झालेल्या अर्जामधून निकषांच्या आधारे अर्जाची छाननी करण्यात येईल. निवडक उमेदवारांना पात्रता प्रवेश परीक्षा व मुलाखतीसाठी बोलावले जाईल. पात्र उमेदवारांची यादी संकेतस्थळावर उपलब्ध होईल. त्यानंतर प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या उमेदवारांची यादी आय.जी.टी. आर. व अमृतच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**कोणकोणते अभ्यासक्रम उपलब्ध आहेत?**

या अंतर्गत अनेक महत्त्वपूर्ण अत्याधुनिक अभ्यासक्रम आहेतः सीएनसी मशीन ऑपरेटर, मशिनिंग तंत्रज्ञान, उत्पादन व गुणवत्ता नियंत्रण, औद्योगिक देखभाल कौशल्ये, संगणक आधारित तांत्रिक प्रशिक्षण आणि उद्योग क्षेत्राला आवश्यक असणारे इतर कौशल्याधारित अभ्यासक्रम

प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रमाणपत्र

प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना अधिकृत प्रमाणपत्र () दिले जाते. हे प्रमाणपत्र शासकीय पार्श्वभूमी असलेल्या अमृत संस्थेचे असल्याने खाजगी आणि निमशासकीय कंपन्यांमध्ये नोकरीसाठी अर्ज करताना याला प्राधान्य मिळू शकते. तसेच, स्वतःचा उद्योग सुरु करण्यासाठी किंवा कर्ज मंजुरीसाठी हे कौशल्य प्रमाणपत्र अत्यंत उपयुक्त ठरू शकते. स्वयंरोजगारासाठी संधी :स्वतःचा उद्योग सुरू करू इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी अमृत संस्थेची वैयक्तिक व्याज परतावा योजना ही योजना उपलब्ध असणार आहे. याचा लाभ घेऊन हा उमेदवार स्वतःचा स्वतंत्र व्यवसाय देखील सुरू करू शकेल. यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन संस्थेकडून उपलब्ध होऊ शकेल. खुल्या वर्गातील अमृत च्या लक्षित गटातील उमेदवारांसाठी योजना

ही योजना विशेषतः खुल्या वर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील (ईडब्ल्यूएस) अमृतच्या लक्षीत गटातील युवक-युवतींसाठी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. आर्थिक अडचणीमुळे प्रशिक्षण घेऊ न शकलेल्या तरुणांना याचा लाभ होणार आहे. त्यामुळे या उमेदवारांनी सदर सुवर्णसंधीचा अतिशय चांगल्या पद्धतीने फायदा करून घ्यावा असे आवाहन ‘‘अमृत‘‘ तर्फे करण्यात आले आहे. प्रशिक्षणानंतर नोकरी, व्यवसायासाठी साहाय्य-प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना विविध नामांकित कंपन्यांमध्ये रोजगाराच्या संधी मार्फत उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. स्वयंरोजगार किंवा उद्योग सुरू करू इच्छिणाऱ्या तरुणांना तांत्रिक मार्गदर्शन, प्रकल्प अहवाल आणि विविध शासकीय योजनांची माहिती दिली जाणार आहे.संपर्क क्र. ७३९१०६५४७४ अधिक माहितीसाठी जिल्हा व्यवस्थापक, अमृत कार्यालय, जालना यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा व्यवस्थापक यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# ६ जुलै रोजी लोकशाही दिनाचे आयोजन

**जालना - प्रतिनिधी**

जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन महिन्याचे पहिल्या सोमवारी करण्याबाबत निर्देश आहेत. तरी जालना जिल्ह्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवार दि. ६ जुलै २०२६ रोजी सकाळी १० ते १२ वाजेपर्यंत लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती उपजिल्हाधिकारी यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे. लोकशाही दिनाकरीता अर्जदार यांनी अर्ज विहीत नमुन्यात १५ दिवस आधी २ प्रतीत पाठवणे आवश्यक आहे. या लोकशाही दिनामध्ये अर्ज देताना त्यांनी संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व या तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झाली नाही, अशाच अर्जदाराने टोकन क्रमांकाच्या पावतीसह विहीत नमुन्यात दोन प्रतीमध्ये अर्ज सादर करावा. ज्या अर्जदाराने तालुकास्तरीय लोकशाही दिनात भाग घेतला नाही, अशा अर्जदाराचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत, असे जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांचे कार्यालयाकडुन सुचित करण्यात येत आहे. लोकशाही दिनात न्याय प्रविष्ट प्रकरणे, राजस्व,अपील, सेवाविषयक आस्थापनाविषयक बाबी, विहीत नमुन्यात नसणारे व त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती न जोडलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाशी तहसीलदार यांच्या स्वाक्षरीची पोच पावती तसेच त्यासाठी दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापुर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल. ज्यांनी त्यापुर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे. परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नये. तसेच लोकशाही दिन विहीत नमुन्याचा अर्ज http://jalna.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. असेही कळविले आहे.

# १० वर्षाच्या बालिकेवरील अत्याचारप्रकरणी वृध्द नराधमास २० वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा

**दत्ता देशमुख**

दहा वर्षाच्या बालिकेवर अत्याचार केल्याच्या गुन्ह्यातील आरोपी बिसन उर्फ भिसन रायसिंग ढवळे यास जिल्हा व सत्र न्यायालयाने २० वर्षाच्या सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली आहे. तसेच ५० हजारांचा दंडही भरण्याचे आदेश दिले आहे.

याविषयी अधिक माहिती अशी की, विशेष जिल्हा व सत्र न्यायाधीश, कृपेश मोरे यांनी आरोपी बिसन उर्फ भिसन रायसिंग ढवळे, वय ८१ वर्ष, रा. सावरगाव ता. जाफ्राबाद यास कलम ६५ (२) व कलम ४,६,८,१०, १२ बाल लैंगिक अत्याचार संरक्षण कायदा २०१२ यानुसार गुन्हा सिध्द झाल्यामुळे आरोपी यांस वीस वर्षे सक्त मजुरी, ५०,०००/- रूपये दंडाची शिक्षा व दंड न भरल्यास सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा ठोठावली. या प्रकरणात महाराष्ट्र शासनाकडून पिडीतेस रूपये ३,००,०००/- भरपाई देण्याचा आदेश मा. विशेष न्यायालयाने दिलेला आहे. सदर प्रकरणात विशेष सरकारी अभियोक्ता वर्षा लक्ष्मीकांत मुकीम यांनी काम पाहिले. घटनेची थोडक्यात हकीकत अशी की, या प्रकरणातील पिडीत मुलगी दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी २ वाजेच्या सुमारास गावातील महादेव मंदिराकडे खेळण्यासाठी जात होती. आरोपी बिसन उर्फ भिसन रायसिंग ढवळे याने तिला आवाज देवून थांबविले.

# टेंभुर्णी येथून जवळच असलेल्या स्वामी विवेकानंद विद्यालय बुटखेडा येथे माजी विद्यार्थ्यांचा गौरव



**दत्ता देशमुख**

जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णी येथून जवळच असलेल्या बुटखेडा
येथील स्वामी विवेकानंद हायस्कूलच्या ११ माजी विद्यार्थ्यांची नुकतीच सैन्य व पोलिस दलात निवड झाली आहे. एकाच वेळी एवढ्या मोठ्या संख्येने शाळेच्या विद्यार्थ्यांनी देशसेवेच्या क्षेत्रात यश मिळवल्याने परिसरातून त्यांचे कौतुक होत आहे.

या यशस्वी विद्यार्थ्यांचा शनिवारी शाळेत आयोजित विशेष कार्यक्रमात सत्कार करण्यात आला. यामध्ये दीपक साबळे, मंगे चंदनशिवे, करण पांडव, प्रतीक निकस, सुर्न गायकवाड, अर्जुन माळी, गोपाल सक हनुमान ढवळे, वैभव सवडे यांच्यासह अ दोन विद्यार्थ्यांचा समावेश आहे. सत्कारान उत्तर देताना विद्यार्थ्यांनी शाळेप्रती कृतज्ञा व्यक्त केली. शिक्षकांचे मार्गदर्शन आ विविध उपक्रमांतून मिळालेला अनुभव नोक मिळविण्यासाठी निश्चितच उपयुव ठरल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी प्राच अशोक बनकर व पालक उपस्थित होते.

# महाकर्जमुक्तीचा ऐतिहासिक निर्णय

शेतकरी राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग आहेत. अनियमित पाऊस, गारपीट, दुष्काळ, अतिवृष्टी व महापूर यांसारख्या नैसर्गिक संकटांमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तसेच त्यांना नव्याने पीक कर्ज उपलब्ध होऊन कृषी क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने सर्वात मोठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६ जाहीर करुन शेतकरी बांधवांना कर्जमुक्ती देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर एक कुशल प्रशासक, रयतेच्या कल्याणासाठी आयुष्य वेचणाऱ्या लोकाभिमुख शासक होत्या. शेती, सिंचन, जलसंधारण आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला त्यांनी दिलेले प्रोत्साहन आजही आदर्श मानले जाते. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना न्याय देण्याची त्यांची भूमिका होती. म्हणूनच त्यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षात शेतकरी कल्याणाशी निगडित या महत्त्वपूर्ण योजनेस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना हे नाव देऊन शासनाने त्यांच्या कार्याला अभिवादन केले आहे.

शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी राज्य शासनाने यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७, महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ आणि महात्मा जोतिराव फुले कर्जमुक्ती योजनेअंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजना २०२२ जाहीर करुन शेतकऱ्यांना वेळोवेळी भरीव मदत केली आहे.

राज्यातील शेतकरी कर्जमुक्तीनंतरही थकीत कर्जाच्या दुष्टचक्रामध्ये अडकत असल्याचे दिसून येते. शेती क्षेत्रात आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडवून शेतकऱ्यांची थकीत कर्जाच्या विळख्यातून कायमस्वरुपी सोडवणूक करण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता म्हणून यादृष्टीने शिफारशी करण्यासाठी मुख्यमंत्री यांचे प्रमुख आर्थिक सल्लागार तथा मुख्य कार्यकारी अधिकारी (मित्र) प्रविण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती गठीत केली होती.

या समितीने शेतकऱ्यांना कर्जमुक्तीची आवश्यकता, शेतकऱ्यांवर वारंवार कर्जमाफीची वेळ का येते? त्यांच्या उत्पन्नात स्थैर्य का निर्माण होत नाही? भविष्यात शेतकरी पुन्हा कर्जाच्या चक्रात अडकू नयेत, शेतकरी सक्षम व्हावा याबाबत अल्पकालीन आणि दीर्घकालीन अशा दोन्ही प्रकारच्या उपाययोजना सुचविलेल्या आहेत. मात्र तातडीचा दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना’ लागू करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

**कर्जमुक्ती योजना काय आहे**

२०१७ मध्ये दीड लाख रुपयांपर्यंत, तर २०१९ मध्ये दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्यात आली होती. यावेळीही दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती देण्यात येत आहे. अल्पमुदतीची थकीत पीककर्जे, तसेच पुनर्गठित आणि फेरपुनर्गठित कर्जाचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे. यावेळी एक महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे आणि तो म्हणजे पूर्वी दोन लाख रुपयांच्या मर्यादेपेक्षा थोडी जास्त रक्कम कर्ज असलेल्या शेतकऱ्यांना लाभ मिळत नव्हता, म्हणजे एकाद्या शेतकऱ्याचे दोन लाख दहा हजार कर्ज असेल तर तो शेतकरी अपात्र होता. आता मात्र अशा शेतकऱ्यांनी स्वतःचा हिस्सा भरल्यानंतर दोन लाख रुपयांपर्यंतची रक्कम शासन भरणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज मिळण्याचा मार्ग सुकर होणार आहे. तसेच यामध्ये जमीन धारणेची अट नाही.

याशिवाय नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन लाभ देण्याची तरतूद करण्यात आली आहे. कर्जफेडीची शिस्त टिकवून ठेवण्यासाठी आणि प्रामाणिक कर्जदारांना प्रोत्साहन देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

**एकवेळ समझोता योजना**

१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२६ अखेर उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जखात्यांची एक किंवा अनेक बँकांकडील सर्व कर्ज खात्यांची मुद्दल व व्याजासह ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली एकत्रित थकबाकीची रक्कम दोन लाखांपेक्षा जास्त असेल अशा शेतकऱ्यांनी दोन लाखांवरील रक्कम भरल्यानंतर त्यांना




लाभ मिळणार आहे. त्यामुळे प्रत्यक्षात शेतकऱ्यांना जी थकित रक्कम आहे त्यापेक्षा कमी रक्कम भरावी लागेल. विशेष म्हणजे अशा शेतकऱ्यांना त्यांच्या हिश्श्याची दोन लाखांवरील थकित रक्कम भरण्यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत कालावधी दिला जाणार आहे.

**प्रोत्साहनपर लाभ**

नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी या योजनेअंतर्गत २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ पैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षात पीक कर्जाची उचल करुन ३० जून पूर्वी किंवा बँकेच्या नियमानुसार विहित वेळेत कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रति शेतकरी रु. ५० हजार पर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे. यासाठी २०२५-२६ व २०२६-२७ या आर्थिक वर्षांतील अल्पमुदत पीक कर्जाचीही वेळेत परतफेड करणे आवश्यक राहील.

तसेच, २०२३-२४ अथवा २०२४-२५ या वर्षात पूर्णतः परतफेड केलेल्या अल्पमुदत पीक कर्जाची रक्कम ५० हजारांपेक्षा कमी असल्यास अशा शेतकऱ्यांना त्यांनी २०२३-२४ अथवा २०२४-२५ या वर्षात अल्प मुदत पीक कर्जाच्या मुद्दल व व्याजासह प्रत्यक्ष परतफेड केलेली रक्कम किंवा ५ हजार प्रोत्साहनपर लाभ मिळणार आहे.

**नियमित परतफेड करणाऱ्यांना मोठा दिलासा**

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०१९ मधील योजनेच्या लाभार्थ्यांसाठी महत्वाची तरतूद यामध्ये करण्यात आली आहे. ज्या शेतकऱ्यांनी १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ पर्यंत उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जाचे केलेले पुर्नगठन/फेरपुर्नगठन थकीत हप्त्याची ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत रक्कम रु. ५० हजार पर्यंत असल्यास पूर्ण कर्जमुक्ती, आणि रु. ५० हजारांपेक्षा जास्त असल्यास एकवेळ समझोता () योजनेचा लाभ मिळणार आणि रक्कम भरण्याची मुदत ३१ मार्च २०२७ असणार आहे.

**योजनेचे निकष**

पात्र शेतकऱ्यांना मुद्दल आणि व्याजासह प्रति शेतकरी २ लाख रुपयांपर्यंत थेट कर्जमुक्ती.

१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जासाठी लागू. ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेल्या कर्जाचा समावेश.

३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेल्या कर्जाचा समावेश. जमीन धारणेची अट नाही. पीक कर्जाचे मध्यम मुदत कर्जात पुनर्गठन/फेरपुनर्गठन केलेल्या थकीत हप्त्यांनाही २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती. २ लाख रुपयांपेक्षा जास्त कर्ज असल्यास अतिरिक्त रक्कम ३१ मार्च २०२७ पर्यंत संबंधित बँकेत जमा केल्यास कर्जमुक्तीचा लाभ. शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण करणे अनिवार्य आहे.

राष्ट्रीयकृत, खाजगी, ग्रामीण, जिल्हा बँका व प्रा. कृषी पतपुरवठा संस्थांच्या कर्जाना लागू.

**कोण पात्र असणार नाहीत**

विद्यमान किंवा माजी मंत्री, राज्यमंत्री, लोकसभा व राज्यसभा सदस्य, विधानसभा व विधान परिषद सदस्य तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांतील (महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायतीचे विद्यमान किंवा माजी सदस्य.

केंद्र किंवा राज्य शासनातील असे अधिकारी व कर्मचारी, ज्यांचे एकत्रित मासिक वेतन रु. २५ हजार पेक्षा अधिक आहे.

राज्य सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (उदा. महावितरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ इ.) तसेच अनुदानित संस्थांतील रु. २५,००० पेक्षा अधिक मासिक वेतन असलेले अधिकारी व कर्मचारी.

शेतीव्यतिरिक्तच्या उत्पन्नावर आयकर भरणाऱ्या व्यक्ती

निवृत्तीवेतनधारक व्यक्ती ज्यांचे २५ हजार पेक्षा अधिक मासिक निवृत्तीवेतन घेणारे निवृत्तीवेतनधारक (मात्र माजी सैनिकांना हा अपवाद लागू राहील). कृषी उत्पन्न बाजार समित्या, सहकारी साखर कारखाने, सहकारी सुतगिरण्या, नागरी सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लिमिटेड तसेच सहकारी दूध संघ यातील अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक मंडळाचे सदस्य, अधिकारी व रु. २५ हजार पेक्षा अधिक एकत्रित वेतन असलेले कर्मचारी. मात्र, सहकारी साखर कारखान्यांतील हंगामी कामगार या अपात्रतेतून वगळण्यात आले असून ते योजनेसाठी पात्र राहतील.

या कर्जमुक्ती योजनेची संपूर्ण अंमलबजावणी प्रक्रिया ऑनलाईन आणि पारदर्शक असून या योजनेचा लाभ सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना मिळणार असून सुमारे ३६ हजार ५०० कोटी रुपयांचे वितरण करण्यात येणार आहे. महाराष्ट्राच्या इतिहासातील ही सर्वात मोठी कर्जमुक्ती योजना ठरणार असून केवळ कर्जमाफी नाहीतर शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे त्यांचा आत्मविश्वास वाढवणे आणि शेती क्षेत्राला नवसंजीवनी देण्याचा उद्देश साध्य करण्याचा प्रयत्न या योजनेच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

**- काशीबाई थोरात,**
**विभागीय संपर्क अधिकारी**

# दामिनी पथकाची शाळांमध्ये जनजागृती मोहीम; विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा,आणि 'गुड टच-बॅड टच'चे धडे

## महिला व बालकांच्या सुरक्षेसाठी जालना पोलिसांचा पुढाकार; आपत्कालीन मदतीसाठी ११२ क्रमांकाची माहिती

**जालना । प्रतिनिधी**

महिला व बालकांच्या सुरक्षेला प्राधान्य देत जालना जिल्हा पोलीस दलाच्या दामिनी पथकामार्फत जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये जनजागृती मोहिमेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थी व विद्यार्थिनींमध्ये कायद्याबाबत जागरूकता निर्माण करणे, सायबर गुन्ह्यांपासून संरक्षणाची माहिती देणे तसेच बालकांच्या सुरक्षेबाबत विश्वास निर्माण करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता.



दामिनी पथकाच्या अधिकाऱ्यांनी शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला. या कार्यक्रमामध्ये सायबर सुरक्षा, पोस्को कायदा, गुड टच-बॅड टच, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर आणि आपत्कालीन मदत क्रमांक ११२ याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

**सायबर गुन्ह्यांपासून सावध राहण्याचे आवाहन**

सध्याच्या डिजिटल युगात मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियाचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. याच पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे महत्त्व पटवून देण्यात आले. सोशल मीडियावर अनोळखी व्यक्तींशी संवाद साधताना घ्यावयाची काळजी, वैयक्तिक माहितीची गोपनीयता, बनावट लिंक, ओटीपी फसवणूक, ऑनलाइन गेमिंगमधील धोके आणि आर्थिक फसवणुकीपासून बचाव याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी कोणत्याही संशयास्पद संदेशांना प्रतिसाद देऊ नये तसेच सायबर गुन्ह्यांची माहिती त्वरित पालक किंवा पोलिसांना द्यावी, असे आवाहन करण्यात आले.

**पोस्को कायद्याविषयी दिली माहिती**

बालकांवरील लैंगिक अत्याचार रोखण्यासाठी लागू करण्यात आलेल्या पोस्को () कायद्याच्या महत्त्वपूर्ण तरतुदींची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. बाल लैंगिक अत्याचार म्हणजे काय, अशा घटना घडल्यास तक्रार कशी करावी, कायदेशीर प्रक्रिया कशी असते आणि पीडित बालकांना कोणते संरक्षण मिळते याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. बालकांच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक विद्यार्थ्याने जागरूक राहणे आणि कोणत्याही प्रकारच्या अनुचित वर्तनाची माहिती तात्काळ विश्वासू व्यक्तींना देणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले.

**'गुड टच-बॅड टच'ची संकल्पना समजावली**

दामिनी पथकाने लहान विद्यार्थ्यांना 'गुड टच' आणि 'बॅड टच' यामधील फरक सोप्या भाषेत समजावून सांगितला. सुरक्षित आणि असुरक्षित स्पर्श ओळखण्याची क्षमता विकसित करणे, कोणत्याही अनुचित प्रकाराची भीती न बाळगता माहिती देणे आणि स्वतःच्या सुरक्षिततेबाबत सजग राहणे याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. कोणत्याही प्रकारचा अयोग्य स्पर्श, छेडछाड किंवा गैरवर्तन झाल्यास त्वरित पालक, शिक्षक किंवा पोलिसांशी संपर्क साधण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले.

**११२ आपत्कालीन सेवा क्रमांकाची माहिती**

कार्यक्रमादरम्यान आपत्कालीन मदत क्रमांक ११२ विषयी विशेष माहिती देण्यात आली. छेडछाड, संशयास्पद घटना, महिला अत्याचार, सायबर गुन्हे किंवा इतर कोणत्याही प्रकारची तातडीची मदत आवश्यक असल्यास नागरिकांनी ११२ वर त्वरित संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले.

वेळीच माहिती दिल्यास पोलीस यंत्रणा तातडीने मदत करू शकते आणि संभाव्य गुन्हे रोखण्यास मदत होते, असेही यावेळी सांगण्यात आले.

**विद्यार्थ्यांमध्ये कायद्याबाबत जागरूकता निर्माण**

या जनजागृती मोहिमेमुळे विद्यार्थ्यांमध्ये कायद्याबाबत जागरूकता निर्माण होत असून, महिला व बालकांच्या सुरक्षेबाबत विश्वास वाढत आहे. शालेय स्तरावर अशा कार्यक्रमांचे आयोजन केल्यामुळे विद्यार्थी आत्मविश्वासाने समस्यांना सामोरे जाऊ शकतात आणि गरज पडल्यास मदत मागण्यास पुढे येतात.

**पालक व शिक्षकांनी सहकार्य करण्याचे आवाहन**

जालना जिल्हा पोलीस दलाने पालक, शिक्षक आणि नागरिकांनी या जनजागृती मोहिमेला सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे. बालकांच्या सुरक्षिततेची जबाबदारी केवळ पोलिसांची नसून समाजातील प्रत्येक घटकाने यात सक्रिय सहभाग घेणे आवश्यक असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

महिला व बालकांच्या संरक्षणासाठी जालना जिल्हा पोलीस दलाचे दामिनी पथक अशा प्रकारचे जनजागृती उपक्रम सातत्याने राबवत असून, भविष्यातही जिल्हाभरात अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

# टेंभुर्णी येथे पाऊसाची जोरदार बॅटिंग बाजारात पाणीच पाणी ,रखडलेली पेरणीला होणार सुरवात

**दत्ता देशमुख**

टेंभुर्णी सह परिसरात मिरगाच्या पाऊसाची प्रतिक्षा संपली असून पहिल्याचा पावसाने जोरात हजेरी लाऊन सगळी कडे पाणीच पाणी केल्याने शेतकरी राजा सुखावला असून मोठ्या पाऊसाने शेतकरी आनंदी झाल्याचे दिसून आले.



पाऊस कधी येणार ही खूप चिंता वाढली होती.मात्र उशीर येणार हे माहित असल्याने शेतकरी यांनी पेरणी केली नव्हती मात्र आता झालेल्या जोरदार पावसाने नक्कीच शेतकरी आता आपल्या शेतीच्या कामाला लागून आपली कामे पूर्ण करतील. मृग नक्षत्र कोरडे गेले असले तरी उशीरा पण जोरदार आलेल्या पावसाने मात्र शेतकरी राजा या पाऊसाने नक्की सुखावणारा असून सगळी कडे आनंदाचे वातावरण दिसून आले. टेंभुर्णी ला आठवडी बाजार सोमवारी असल्याने पाऊस येणार असे कोणतेच चिन्ह नसल्याने आणि आलेल्या जोरदार पाऊसाने भाजी *(पान २ वर)*

## २८ जुन रोजी पल्स पोलिओ मोहिम

# २ लक्ष ५६ हजार बालकांना पोलिओची मात्रा देण्याचे उद्दिष्ट - डॉ.जयश्री भुसारे

**जालना - प्रतिनिधी**

संपुर्ण जालना जिल्हयामध्ये राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिम २८ जुन रविवारी राबविण्यांत येणारं आहे. पल्स पोलिओ मोहिम अंतर्गत जालना जिल्हयातील ० ते ५ वयोगटातील २ लक्ष ५६ हजार ८७५ बालकांना पोलिओची मात्रा २८ जुन रोजी देण्यांचे उद्दिष्ट असुन ० ते ५ वर्षे वयोगटातील सर्व बालकांनी पल्स पोलिओ लस या दिवशी घ्यावी असे आवाहन डॉ.जयश्री भुसारे जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी केले.



पल्स पोलिओ मोहिमेसाठी सुक्ष्मकृती आराखडयाचे तयार करुन त्याप्रमाणे नियोजन केले आहे. ग्रामीण, शहरी भागामध्ये पल्स पोलिओ बुथचे आयोजन करुन कर्मचारी, पर्यवेक्षक यांची डयुटी लावण्यांत आलेली आहे. जिल्हयामध्ये पल्स पोलिओ मोहिम यशस्वी होण्यासाठी एकुण ५५४७ मनुष्यबळाचा वापर करण्यांत येणार आहे. अंगणवाडी, उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, शहरी नागरी आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा स्त्री रुग्णालय, जिल्हा रुग्णालय, रेल्वे स्टेशन, बस स्टँण्ड व काही खाजगी रुग्णालय येथील पोलिओ बुथवर ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांना पोलिओची लस सकाळी ८.०० ते सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत देण्यांत *(पान २ वर)*

# उपविभागीय अधिकारी जालना यांच्या अध्यक्षेत विविध विषयावरील सभा संपन्न

**जालना- प्रतिनिधी**

पल्स पोलिओ लसीकरण मोहिम, स्टॉप डायरिया कॅम्पेन एमआर निर्मुलन व नियमित लसीकरण, एचपीव्ही लसीकरण. एकात्मिक आरोग्यवर्धिनी समिती, आशा कार्यबल गट सभा, माझं गाव आरोग्य संपन्न गाव अभियान आदी विषयावर आज उपविभागीय अधिकारी जालना यांच्या अध्यक्षेत सभा संपन्न झाल्या.

यावेळी सहायक महसुल अधिकारी संदीप डेबडे, डॉ. सुदाम गवारे वैद्यकिय अधिक्षक, पक्षक, महिला व बाल रुग्णालय जालना डॉ. विजय वाकोडे वैद्यकिय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय नेर, तहसीलदार यांचे प्रतिनीधी,गट विकास अधिकारी याचे प्रतिनिधी, एकात्मीक बाल विकास अधिकारी, गट शिक्षण अधिकारी, डॉ. श्याम राठोड तालुका आरोग्य अधिकारी प्राथमि आरोग्य केंद्र वैद्यकिय अधिकारी, आरोग्य सहाय्यक व सहाय्यीका तालुका आरोग्य अधिकारी स्तरीय स्टाफ यांची उपस्थिती होती.

पल्स पोलिओ लसिकरण मोहिम, स्टॉप डायरिया कॅम्पेन, एमआर निर्मुलन व नियमित लसीकरण मोहिम :- २८ जुलै २०२६ रोजी राबविण्यात येणार असुन यात ० ते ०५ वर्ष वयो गटातील बालकाचे लसीकरण करण्यात येणार आहे यात लसीकरण करीता २२७ बुथ व कर्मचारी ६११ आहेत, मोबाईल टिम १३, ट्राझीट टिम १४ आहेत. एचपीव्ही लसीकरण :- एचपीव्ही लसीकरण १४ वर्षे वयोगटातील (ज्यांनी १४ वर्षे पूर्ण केलेली आहेत व १५वर्षे पूर्ण केलेली नाहीत) मुलींना देण्यात येईल. मोहिम सुरू झाल्यानंतर तर पुढील ९० दिवसांच्या कालावधीत १५ वर्षे पूर्ण होणाऱ्या मुली देखील या तीन महिन्यांच्या एचपीव्ही (एचपीव्ही) लसीकरणमोहिमेत लसिकरणास पात्र राहतील. एकूण लोकसंख्येच्या १ टक्का लाभार्थी ही मोहिमेकरीता अपेक्षित लाभार्थी असतील. एकात्मीक आरोग्यवर्धिनी समिती :- राज्य शासनाने संदर्भिय शासन निर्णय दि. १४ मे २०२६ अन्वये राज्यातील आरोग्य विषयक उपक्रम लोकाभिमुख, गतिमान व बळकट करण्यासाठी आरोग्य संस्थाद्वारे पुरविण्यात येणाऱ्या आरोग्य सेवांच्या दर्जात गुणात्मक व परिणामकारक वाढ / सुधारणा करणे, आरोग्य सुविधांचे बळकटीकरण करणे, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम व राज्य धोरणातंर्गत *(पान २ वर)*

# ऊसतोड कामागारांच्या पाल्यांना संत भगवानबाबा शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

सहायक आयुक्त, समाजकल्याण कार्यालयामार्फत ऊसतोड कामगारांच्या पाल्यांच्या शिक्षणासाठी संत भगवानबाबा वसतिगृह योजना राबविण्यात येते. यायोजनेअंतर्गत जिल्ह्यातील जालना, अंबड, मंठा, बदनापूर या ठिकाणी प्रत्येकी २ मुलांचे १ व मुलींचे १ व घनसावंगी येथे मुलांचे १ अशी एकुण ९ वसतिगृहे आहेत. या ९ वसतिगृहांची एकुण क्षमता ९०० आहे. शासकीय वसतिगृहांमध्ये इयत्ता ५ वी ते पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या ऊसतोड कामगारांच्या पाल्यांना प्रवेश दिला जातो. प्रवेशितांची निवास व भोजनाची मोफत सोय असते तसेच त्यांना आवश्यक असलेली वह्या, पुस्तके, शालेय स्टेशनरी इत्यादी सुविधा विनामुल्ये पुरविण्यात येते. जिल्हास्तरीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना दरमहा रु.६००/- व तालुकास्तरावरी विद्यार्थ्यांना दरमहा रु. ५००/- निर्वाहभत्ता देण्यात येतो. वसमिगृहामध्ये प्रवेशासाठी अर्जदार विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे तसेच विद्यार्थी ऊसतोड कामगाराचा पाल्य असावा. संत भगवानबाबा मुलींचे वसतिगृह, जालना मान्य संख्या १००, संत भगवानबाबा मुलांचे वसतिगृह, जालना मान्य संख्या १००, संत भगवानबाबा मुलींचे वसतिगृह, अंबड मान्य संख्या १००, संत भगवानबाबा मुलांचे वसतिगृह, अंबड, मान्य संख्या १००, संत भगवानबाबा मुलींचे वसतिगृह, मंठा मान्य संख्या १००, संत भगवानबाबा मुलांचे वसतिगृह, मंठा मान्य संख्या १००, संत भगवानबाबा *(पान २ वर)*

# मत्स्योदरी अभियांत्रिकीच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप

**बदलता महाराष्ट्र वृत्तसेवा**

जालना (प्रतिनिधी) : मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना नुकताच निरोप देण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून महाविद्यालयातील आठवणींना उजाळा दिला. महाविद्यालयातील उच्चशिक्षित प्राध्यापकांकडून मिळालेले दर्जेदार शिक्षण, तसेच अभियांत्रिकी शिक्षणादरम्यान




मिळालेले सैद्धांतिक व प्रात्यक्षिक ज्ञान हे पुढील उच्च शिक्षण व करिअरमध्ये निश्चितच उपयुक्त ठरणार असल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. बिरादार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, मत्स्योदरी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विद्यार्थी भविष्यात विविध उच्च पदांवर कार्यरत राहून महाविद्यालयाचे नाव उज्वल करतील. अंतिम वर्षातील १४८ विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या सामंजस्य करारांतर्गत आंतरराष्ट्रीय सॉफ्टवेअर कंपनीमध्ये प्रशिक्षण घेतले असून, त्यापैकी ५२ विद्यार्थ्यांना नोकरी प्राप्त झाली आहे. उर्वरित विद्यार्थ्यांनाही विविध कंपन्यांकडून मुलाखती व कॉल्स येत असून, येत्या काही महिन्यांत सर्व विद्यार्थ्यांना रोजगाराच्या *(पान २ वर)*

# जालना जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा आनंदी अय्यर यांना पुरस्कार

**बदलता महाराष्ट्र वृत्तसेवा**

जालना (प्रतिनिधी) : आंतरराष्ट्रीय एमएसएमई दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य सोहळ्यात जालना येथील आशा कॉम्प्युटर इन्स्टिट्यूटच्या संचालिका आनंदी सुब्रमणियम अय्यर यांना एमएसएमई सुपर स्टार पुरस्कार २०२६ या प्रतिष्ठित



पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार राज्यसभा सदस्या डॉ. ज्योती वाघमारे, झोनल जनरल मॅनेजर एनएसआयसी डी.डी.महेश्वरी, हस्तकला, वस्त्रोद्योग मंत्रालय, भारत सरकार सहाय्यक संचालक सुरेश नारायण तांडेकर तसेच संस्थापक, झेप उद्योजिनी पौर्णिमा शिरीषकर यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला. आनंदी अय्यर



यांनी गेल्या अनेक वर्षांपासून संगणक शिक्षण, डिजिटल साक्षरता, महिला सक्षमीकरण, कौशल्य विकास आणि उद्योजकता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सन्मानामुळे जालना जिल्ह्याचे नाव राज्य व राष्ट्रीय स्तरावर उज्वल झाले असून विविध क्षेत्रातील मान्यवर, विद्यार्थी, पालक व हितचिंतकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.